# एम. आय. एम. ई. आर. वैद्यकीय महाविद्यालय व डॉ. भाऊसाहेब सरदेसाई तळेगाव ग्रामीण रूग्णालय,

तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे-४१०५०७

## रूग्णाचा अधिकार

- जात /धर्म यांचा विचार न करता उपलब्ध उत्तम उपचार मिळणे तसेच जीवरक्षक प्रणालीचे उपचार आर्थिक परिस्थितीचा विचार न करता मिळण्याचा अधिकार.
- डॉक्टर निवडण्याचा अधिकार.
- आदरपूर्वक उपचार मिळण्याचा अधिकार.
- उपचार स्वीकारण्याचा तसेच नाकारण्याचा अधिकार तसेच संपूर्ण माहिती घेउन निर्णय घेण्याचा अधिकार.
- रूग्णालयामधील डॉक्टरांसह सर्व स्तरातील कर्मचा-याकडून आदरपूर्वक तसेच कोणताही भेदभाव न करता उपचार मिळण्याचा अधिकार.
- दुस-या डॉक्टरांचे मत घेण्याचा अधिकार. रूग्ण निर्णय घेण्याच्या परिस्थितीत नसल्यास रूग्णाचे पालक /कायदेशीर प्रतिनिधी यांना निर्णय घेण्याचा अधिकार.
- रूग्णाच्या सेवेशी निगडीत व्यक्तींचे नाव जाणून घेण्याचा तसेच उपचाराबाबत शंका विचारण्याचा अधिकार
- स्वतःच्या वैद्यकीय उपचारांची कागदपत्रे जाणून घेण्याचा तसेच त्याची प्रत मिळण्याचा अधिकार.
- रूग्णालय तसेच सेवा पुरविणा-या व्यक्तींबद्दलच्या तक्रारींची योग्य दखल घेतली जाण्याचा अधिकार.
- वैद्यकीयदृष्टया आवश्यक नसलेली बंधने नाकारण्याचा अधिकार.

- आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता केल्यानंतर वैद्यकीय सल्ल्याविरूध्द् रूग्णालय सोडण्याचा अधिकार.
- कोणत्याही संशोधन अभ्यास प्रकल्पात सहभागी होण्यापूर्वी माहिती पूर्वक संमतीचा अधिकार
- देयकाचा अंदाज तसेच तपशील मिळण्याचा अधिकार.

## रूग्णांच्या जबाबदा–या

- रूग्णालयाशी प्रामाणिक रहाणे. उपचारकर्त्या व्यक्तींना तुमचा वैद्यकीय पूर्व इतिहास तसेच सद्यस्थितीची खरी माहिती देणे.
- उपचार अथवा दिलेल्या सूचनांबद्दल शंका असल्यास रूग्णालय वा उपचारकर्त्यांना सांगणे.
- रूग्णालय कर्मचा–यांशी प्रक्षोभक वर्तन न करणे, शाब्दिक /शारीरिक गैरवर्तन न करणे.
- रूग्णालयात ईतर रूग्णांना त्रास होईल असे कोणतेही वर्तन जाणीवपूर्वक न करणे.
- रूग्णालयाच्या सर्व नियमांचे पालन करणे.
- उपचारासंबंधीच्या निर्णय प्रक्रियेमध्ये सहभागी होणे तसेच त्याबाबतचे शंका निरसन करून घेणे.
- इतर रूग्ण तसेच रूग्णालय कर्मचा–यांच्या अधिकारांचा आदर राखणे.
- रूग्णालयाने सांगितलेल्या उपचार नियमावलीचे पालन करणे.
- उपचारांसाठीच्या देयकांची पूर्तता प्राधान्याने व तत्परतेने करणे.
- वैयक्तिक गोष्टी/मौल्यवान वस्तूंची जबाबदारी पूर्णपणे रूग्ण/नातेवाईकांवर राहील.